दैनिक
# जळगाव वृत्त
email-jalgaonvrutt1980@gmail.com
facebook.com/jalgaonvrutt.dainaik
http://www.jalgaonvrutt.com/
वर्ष– २९ अंक – १६५ जळगांव – सोमवार १४ डिसेंबर २०२० किंमत–१ रुपये पाने– ८

# गोपनीयता, अखंडता आणि उपलब्धता यावर सायबर सुरक्षितता अवलंबून असते-सौ सुगंधा दाणी

फैजपूर प्रतिनिधी

धनाजी नाना महाविद्यालय फैजपुर,इंटरनल क्वालिटी अस्सुरंस सेल आणि क्विक हिल, पुणे व विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सिक्युरिटी या विषयावर ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.
अध्यक्षस्थानी धनाजी नाना महाविद्यालया चे प्राचार्य डॉ पी आर चौधरी होते.
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पुणे चे संचालक डॉ विवेक देशपांडे तसेच व्ही आई आई टी, पुणे येथील असोसिएट डीन श्री सुभाष तटाळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. क्विक हिल फाउंडेशन, पुणे च्या वरिष्ठ कार्यकारी अधिकारी सौ सुगंधा दाणी या प्रमुख व्याख्यात्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी धनाजी नाना महाविद्यालय फैजपुर येथील आई क्यू ऐ सी चे कोऑर्डिनेटर उप प्राचार्य डॉ उदय जगताप, उप प्राचार्य डॉ ए आय भंगाळे, उप प्राचार्य डॉ ए जी सरोदे आणि उप प्राचार्य प्रा डी बी तायडे यांचीही उपस्थिती होती. वेबिनारच्या समन्वयिका प्रा निवेदिता भिरुड यांच्या अथक परिश्रमातुन हा कार्यक्रम घडून आला. या वेळी सायबर सुरक्षिततेवर बोलताना सुगंधा दाणी यांनी सायबर सुरक्षिततेसाठी सायबर शिक्षा कशी महत्वाची आहे हे विविध उदहरणाद्वारे विद्यार्थ्यांना सांगितले. सुरक्षिततेचे विविध पैलु संगताना सोशियल मीडिया वर सुरक्षित कसे रहावे, सेफ डाऊनलोडिंग कसे करावे, एटीएम कसे हताळले पाहिजे आशा अनेक गोष्टी विद्यार्थ्यांना समजाऊन संगीतल्या. वर्चुअल लाइफ जशी आवश्यक आहे तशीच रियल लाइफ सुद्धा जगा आणि घराबाहेर पडताना जस कुलुप लावता तसंच इंटरनेट वरुन लॉग आउट होऊन बाहेर पडा असही त्यांनी सांगितले. विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पुणे येथील असोसिएट डीन श्री सुभाष तटाळे यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सामाजिक जागरूकता आणि सायबर जागरूकता या विषयी माहिती दिली. आय क्यू ए सी चे कोऑर्डिनेटर उप प्राचार्य डॉ उदय जगताप यांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन यावेळी केले.
भविष्यामध्ये मनस्ताप टाळण्यासाठी अगोदरच सायबर जगतात सुरक्षितता बाळगन्याचा मोलाचा सल्ला डॉ उदय जगताप यांनी विद्यार्थ्यांना दिला. धनाजी नाना महाविद्यालय फैजपुर, येथील कार्यक्रमाच्या समन्वयिका प्रा. डॉ सविता वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा डॉ सरला तडवी यांनी केले तर आभार प्रा डॉ कल्पना पाटील यांनी मानले.